स्वामी स्वरूपानंद सह. पतसंस्था, रत्नागिरी यांचे मुखपत्र

# स्वरूप सहकार

ऑगस्ट २०२५



स्वातंत्र्यदिनाच्या
शुभेच्छा!



## स्वरूपानंद पतसंस्थेच्या ठेवींनी गाठली नवी उंची

**₹ ३७८.९९ कोटी**
(जुलै २०२५ अखेर)



मुख्यमंत्री सहायता निधीला
एक लाखाची मदत

**₹ ३०.०५+ कोटी**
(२० जून ते २० जुलै ठेववृद्धी मासातील ठेवी)

**₹ ३४६.२१ कोटी**
(मार्च २०२५ अखेर)

## 'सहकार से समृद्धी'



# 'नवयुवकांनो, सहकारातील संधी तुमची वाट पाहत आहेत...'

केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या स्थापना सप्ताहाच्या निमित्ताने स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने सहकार या विषयाची माहिती महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा उपक्रम राबवला. त्या उपक्रमांतर्गत संस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी विविध महाविद्यालयांमध्ये व्याख्यानांच्या माध्यमातून सहकार चळवळीचा परिचय करून दिला आणि सहकारी संस्थांविषयी सविस्तर माहिती दिली. 'ग्रामीण अर्थकारण गतिमान करण्यासाठी सहकार चळवळीचे क्षेत्र अंगीकारा. सहकार चळवळीत रोजगार संधी, व्यावसायिक संधी, उद्योजकतेच्या संधींबरोबरच नेतृत्व करण्याच्याही भरपूर संधी असून, त्या नवयुवकांची वाट पाहत आहेत. सध्याच्या भांडवलशाही स्पर्धात्मक युगातही सहकाराची सामूहिक चळवळ प्रभावी ठरते,' असे प्रतिपादन ॲड. पटवर्धन यांनी केले. रत्नागिरीतील गांगण-केळकर कनिष्ठ महाविद्यालय (फाटक हायस्कूल), पटवर्धन हायस्कूल, नवनिर्माण कनिष्ठ महाविद्यालय, तसेच जाकादेवीतील मुळ्ये विद्यालय व कदम कनिष्ठ महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमांना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला.




गांगण-केळकर कनिष्ठ महाविद्यालय (फाटक हायस्कूल), रत्नागिरी




पटवर्धन हायस्कूल, रत्नागिरी




नवनिर्माण कनिष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी




मुळ्ये विद्यालय व कदम कनिष्ठ महाविद्यालय, जाकादेवी

संपादकीय


# 'सहकार से समृद्धी' मंत्राला सक्रिय चालना देऊ या

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या यंदाच्या ठेववृद्धी मासाचा महोत्सव सर्व गुंतवणूकदारांच्या प्रचंड प्रतिसादाने भरभरून यशस्वी झाला. ३० कोटी पाच लाख रुपयांच्या नवीन ठेवी पतसंस्थेच्या अर्थविश्वात समाविष्ट झाल्या. या नव्या ठेवींसह २० जून ते २० जुलै या महिन्यात ११६ कोटी रुपयांचे व्यवहार ठेवींसंदर्भाने झाले. १९००च्या घरात नवीन ठेवखाती या ठेव योजनेत पतसंस्थेत सुरू झाली. प्रधान कार्यालयात पाच कोटी, तर मारुती मंदिर शाखेत चार कोटींच्या ठेवी जमा झाल्या. राजापूर, कोकणनगर, कुवारबाव, पावस, मालगुंड, नाटे या शाखा प्रत्येकी दोन कोटींच्या पुढे ठेव संकलित करणाऱ्या शाखा ठरल्या. सर्वच शाखांमध्ये मोठ्या प्रमाणावर ठेव प्रतिसाद प्राप्त झाला. हा प्रतिसाद नवी ऊर्जा देणारा आहे. संस्थेच्या विश्वासार्ह प्रतिमेचे हे प्रकटन आहे. हा विश्वास प्राणपणाने जपत तो अधिक वृद्धिंगत व्हावा म्हणून सतत प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यासाठी 'टीम स्वरूपानंद' कटिबद्ध आहे.

स्वातंत्र्यदिनानिमित्त भारतमातेला वंदन करतानाच सर्व नागरिकांना शुभेच्छा देण्याची संधी घेतो. २०४७पर्यंत भारताला विकसित प्रगत राष्ट्र म्हणून प्रस्थापित करण्याचा संकल्प घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतवर्षाला नवप्रेरणा दिली आहे. 'सबका साथ, सबका विकास' या घोषवाक्याने आपल्या सहकार चळवळीवरची जबाबदारी अधिक वाढवली आहे. प्रगत भारतवर्षाच्या निर्मितीमध्ये सहकार क्षेत्राचे मोठे योगदान असेल. 'सहकार से समृद्धी' हे उद्दिष्ट ठेवून नव्या प्रगतिशील धोरणाचा अंगीकार करून सहकार क्षेत्रही आपल्या योगदानाला सिद्ध झाले आहे.

भारताचे दरडोई उत्पन्न विकसित राष्ट्राच्या प्रमाणात वाढवायचे असेल, तर सहकार चळवळीचा वेग वृद्धिंगत केला पाहिजे. जागतिकीकरणाच्या भांडवलशाही युगाइतकेच महत्त्व सहकार चळवळीला देणे आवश्यक आहे. सहकार चळवळीचा अंगीकार भारताच्या प्रत्येक नागरिकाने केला पाहिजे. भारताच्या अंगभूत गुणात सहकार आहे. आपल्या संस्कृतीत, परंपरेत सहकाराची तत्त्वे जागोजागी आढळतात. असा अंगभूत सहकार ग्रामीण भागाच्या प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचला, तर मोठी भांडवलनिर्मिती आणि त्यातून उत्पादकता, रोजगार वृद्धिंगत होऊन अर्थचक्राला गतिमानता येईल. गावागावात, शहराशहरात वेगवेगळ्या सहकारी संस्था स्थापन करून त्यातून भांडवलनिर्मिती आणि नवीन व्यवसाय, मार्केटिंगची चेन, ट्रान्स्पोर्ट, वेअरहाउसेस असे नेटवर्क उभे करण्यासाठी सहकार चळवळ प्रगत व्हायला हवी. त्यामध्ये तरुण रक्ताला सामावून घ्यायला हवे. यासाठी सहकाराने व्यावसायिकता अंगीकारायला हवी. नवतंत्रज्ञान अंगीकारायला हवे. हे सर्व घडावे हे योजून केंद्रीय सहकारमंत्री अमितभाई शहा यांनी नवे सहकार धोरण नुकतेच घोषित केले. त्यानुसार स्वरूपानंद पतसंस्थेनेही आपले सुसंगत धोरण ठरवण्याचा निर्णय घेतला आहे.

भारताची अर्थव्यवस्था जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर आहे. नजीकच्या काळात फ्रान्सला मागे टाकून ती तिसऱ्या स्थानावर जाईल; पण अर्थव्यवस्थेचा केवळ आकार वाढून खरा विकास साधला जाणार नाही. ग्रामीण अर्थकारण गतिमान करून उत्पन्न गटांतील विषमता संपवण्यासाठी काम करण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठी सहकार हे माध्यम उपयुक्त आहे. आपण स्वरूपानंद पतसंस्थेचे उदाहरण घेऊ या. आपल्या या सहकारी संस्थेने ६०० कोटी रुपयांचा संमिश्र व्यवसाय केला. त्यात ३७८ कोटी रुपयांच्या ठेवी असून, २६७ कोटींची कर्जे वितरित केली आहेत. १५२ कोटी रुपयांची गुंतवणूक केली. १७ शाखांच्या माध्यमातून ४८ हजारांच्या घरात सभासद संलग्न केले. १००हून अधिक युवकांना थेट रोजगार दिला. अप्रत्यक्षपणे हजारो नागरिकांना रोजगारपूरक गोष्टी उपलब्ध केल्या. हे व्रत स्वरूपानंद पतसंस्था शासनाची कोणतीही मदत न घेता गेली ३४ वर्षे करते आहे. याचा अर्थ पतसंस्थेच्या अर्थकारणातून राष्ट्रीय संपदेत भर पडत आहे. भांडवलनिर्मिती, रोजगारनिर्मिती, भांडवल पुरवठा संस्थेच्या माध्यमातून होत आहे. याच गोष्टी दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी उपयुक्त होतात. सरकारी यंत्रणेवरचा, व्यवस्थेवरचा ताण यातून कमी होतो. दुसऱ्या बाजूला सभासदांना आवश्यक सेवा देण्याची यंत्रणा कार्यान्वित होते. सहकाराचे हेच काम राष्ट्रीय धोरणनिर्मात्यांना अपेक्षित आहे. याचा अर्थ स्वरूपानंद व अशा स्वरूपाच्या अनेक सहकारी संस्था राष्ट्रनिर्मितीच्या कामी योगदान करत आहेत. ही ताकद आहे सहकारातील सर्व सभासदांची. ही सामूहिक ताकद अधिक विकसित करण्यासाठी स्वरूपानंद पतसंस्थेच्या विविध सेवांचा लाभ घ्या आणि सहकार चळवळीच्या 'सहकार से समृद्धी' मंत्राला सक्रिय चालना द्या.



**- ॲड. दीपक म. पटवर्धन**
**अध्यक्ष, स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था**
**संपादक, स्वरूप सहकार**

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था म., रत्नागिरी जिल्हा या पतसंस्थेचे 'स्वरूप सहकार' हे मासिक स्वरूपानंद प्रिंटिंग सर्व्हिसेस, लांजा येथे छापून प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी-४१५६१२ येथे प्रसिद्ध केले.

**ऑगस्ट २०२५. पाने १६. संपादक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **कार्यकारी संपादक :** अनिकेत कोनकर.

**मुद्रक, प्रकाशक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **मांडणी आणि सजावट :** कोकण मीडिया, एटीएमएस ग्राफिक्स.

**संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :** प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी-४१५६१२. संपर्क : (०२३५२) २२१२६३/२९५३६३.

**वेबसाइट :** https://swaroopanandpatsanstha.com/ **ई-मेल :** swaroopsahakarrtn@gmail.com.

**This Monthly Swaroop Sahakar printed and published by Adv. Deepak Manohar Patwardhan, on behalf of Swami Swaroopanand Sahakari Patsanstha Ltd., Ratnagiri and printed at Swaroopanand Printing Services, Lanja and published at Presidency Business House, Opp. S. T. Stand, Ratnagiri-415612. Editor: Adv. Deepak Manohar Patwardhan. Executive Editor: Aniket Konkar. August 2025.**

# ‘पतसंस्थेवरील विश्वासाचे प्रतिबिंब ठरलेला ठेववृद्धी मास’

**रत्नागिरी :** स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचा ठेववृद्धी मास दर वर्षीप्रमाणे २० जून ते २० जुलै या कालावधीत आयोजित करण्यात आला. या ठेववृद्धीमासात तब्बल ३० कोटी पाच लाख रुपयांच्या ठेवी जमा झाल्या. आतापर्यंतचा हा उच्चांक असून यापूर्वी एका ठेववृद्धी मासात १८ कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्या होत्या. पतसंस्थेच्या ठेवींनी ३७९ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला असून, आर्थिक संस्थेला अभिमान वाटावा, अशी ही स्थिती असल्याचे पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी आनंदाने सांगितले.

स्वरूपानंद पतसंस्थेच्या या ठेववृद्धी मासात मुदत संपल्याने नूतनीकरण केलेल्या ठेवी ८७ कोटी ३८ लाख रुपये असून, एकूण ११७ कोटी ४३ लाख रुपयांचे ठेव व्यवहार झाले. २७० ठेवीदारांनी संस्थेकडे आपली ठेव रक्कम नव्याने ठेवली. संस्थेच्या सर्वच शाखांमध्ये मोठ्या प्रमाणावर ठेवीदारांचा प्रतिसाद मिळाला. स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या एकूण ठेवी आता ३७९ कोटी ३० लाखांपर्यंत पोहोचल्या आहेत. स्वरूपानंद पतसंस्थेने विविध कारणांसाठी वितरित केलेले




येणे कर्ज २६४ कोटी तीन लाख रुपये आहे. जून महिन्यापर्यंत कर्जाची वसुली ९९.७१ टक्के इतकी विक्रमी राहिली आहे. संस्थेने प्रमाणबद्ध पद्धतीने अपेक्षित असल्याप्रमाणे एसएलआर, तसेच विविध निधींची १०० टक्के गुंतवणूक ‘महाराष्ट्र सहकार कायदा कलम ७० अ’नुसार योग्य बँकेत केलेली आहे, अशी माहिती ॲड. पटवर्धन यांनी दिली.

संस्थेच्या भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण २८ टक्के इतके भरभक्कम आहे. संस्थेचा सीडी रेशो ६७ टक्के इतका आहे. संस्थेच्या आर्थिक ताकदीचा निर्देशक असलेला स्वनिधी आता ४८ कोटी १३ लाख रुपये झाला आहे. संस्थेचे अधिकारी, कर्मचारी यांनी नियोजनबद्ध संपर्क आणि संवाद साधून समाजाच्या सर्व स्तरांतून ठेवी संकलित केल्या. २७० नवे खातेदार या ठेव वृद्धीमासामध्ये संस्थेशी संलग्न झाले. जनमानसात संस्थेची असलेली पारदर्शक प्रतिमा आणि संस्थेवर असलेला विश्वास या निमित्ताने प्रतिबिंबित झाला, असे सांगून संस्थेचे अध्यक्ष ॲड. पटवर्धन यांनी सर्व ठेवीदारांचे आभार मानले. सर्व ग्राहक सभासदांना उत्तमोत्तम आर्थिक सेवा देण्याचे व्रत संस्था सदैव सुरू ठेवील, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली. ठेववृद्धी मासापूर्वी जाहीर केल्यानुसार संस्थेकडे नव्याने ठेव ठेवलेल्या प्रत्येक ठेवीमागे ठरावीक रक्कम संस्थेच्या सामाजिक दायित्व निधीमधून सैनिक कल्याण निधीसाठी दिली जाणार असल्याचेदेखील ॲड. पटवर्धन यांनी सांगितले.

# मुख्यमंत्री सहायता निधीला एक लाखाची मदत

**रत्नागिरी :** आपल्या वाढदिवसाला शुभेच्छा जाहिरात, बॅनरबाजी न करता मुख्यमंत्री सहायता निधीला मदत करावी, असे आवाहन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देऊन स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी एक लाख रुपये दिले. एक लाख रुपयांचा धनादेश स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांच्याकडे सुपूर्द केला आणि त्याद्वारे मुख्यमंत्री फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापक मोहन बापट आणि उपव्यवस्थापक हेमंत रेडीज उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस २२ जुलै रोजी असतो. या दिवशी अनेक जण शुभेच्छापर जाहिराती देतात. बॅनर लावतात; मात्र ‘हा खर्च करण्याऐवजी मुख्यमंत्री सहायता निधीला मदत करावी. कारण त्यातून राज्याच्या जनतेला मदत करता येते,’ असे भावनिक आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले होते. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. पटवर्धन यांनी पतसंस्थेच्या वतीने मुख्यमंत्री सहायता निधीकरिता एक लाख रुपये देण्याचे सर्वांच्या सहमतीने ठरवले. त्यानुसार जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांच्याकडे हा धनादेश सुपूर्द करण्यात आला. या निधीबद्दल जिल्हाधिकाऱ्यांनी ॲड. दीपक पटवर्धन यांचे अभिनंदन केले. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची देदीप्यमान वाटचाल आणि सामाजिक दायित्व याबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला. ‘स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था नेहमीच लोकमानसाचा अंदाज घेत नावीन्यपूर्ण आणि उपयुक्त उपक्रम राबवत असते. मुख्यमंत्री सहायता निधीला मदत करून संस्थेने राज्याच्या प्रभावी, प्रगल्भ, लोकप्रिय नेतृत्वाचा वाढदिवस साजरा केला,’ अशी भावना ॲड. पटवर्धन यांनी व्यक्त केली.

# पतसंस्थेची **मजबूत आर्थिक स्थिती** दर्शवणारे घटक

**स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेची आर्थिक स्थिती मजबूत आहे, हे आपणा सर्वांना माहितीच आहे; पण पतसंस्थेचे हे सामर्थ्य दर्शवणारे घटक नेमके कोणते आहेत, हे कदाचित सर्वांना माहिती असेलच असे नाही. स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था विश्वासार्ह, पारदर्शक आणि आर्थिक शिस्तीची आहे, म्हणजे नेमके काय आहे? पतसंस्थेची स्थिती दर्शवणारे घटक कोणते असतात, याबद्दल सविस्तर माहिती करून देणारा हा संस्थाध्यक्षांचा लेख...**


कोणतीही आर्थिक संस्था अचानक आघाडीची संस्था होत नाही. केवळ मोठे भांडवल ओतून, मोठा कर्जव्यवहार करून कोणतीही आर्थिक संस्था एका दिवसात विश्वासार्ह होत नाही. त्यासाठी सातत्याची गरज असते, स्वतःची प्रतिमा निर्माण करावी लागते. ग्राहक सभासद, समाजाला संस्थेबद्दलचे आलेले अनुभव, संस्थेने स्वतःचे केलेले प्रेझेंटेशन, संस्थेची सातत्याने वाढत जाणारी आर्थिक आकडेवारी यातून संस्थेची प्रतिमा निर्माण होते; मात्र प्रारंभी संस्थेचे काम करणाऱ्या व्यक्ती, जनमानसातील त्यांचे स्थान या गोष्टींना अनन्यसाधारण महत्त्व असते. नव्या युगात प्रसिद्धीमाध्यमांचा उपयोग आणि आकर्षक जाहिरातबाजी, संस्थेची अद्ययावत कार्यालये ही संस्थेच्या प्रतिमानिर्मितीचा घटक ठरतात. संस्थेबद्दल सर्वदूर एक मत तयार होते; मात्र तयार होणारे चांगले मत वृद्धिंगत करत नेण्याची जबाबदारी संस्थाचालकांची असते.

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने सहकार क्षेत्रात फार धीम्या गतीने सुरुवात केली. प्रारंभी या संस्थेबद्दल कोणीच फार अपेक्षा ठेवल्या नव्हत्या; पण हळूहळू संस्थेने आपल्या आर्थिक व्यवहारांत गती आणली. विविध उपक्रम राबवले व जनमानसात आपली ओळख निर्माण केली. हळूहळू, पण सातत्याने व्यवहार वाढत गेले. ठेवी, भांडवलनिर्मिती, त्यातून कर्जवितरण, मग कर्जांची वसुली हे चक्र नियमित वेगाने फिरू लागले. म्हणजे केवळ ठेव उभारून कर्ज हे त्रैराशिक न राहता कर्जवसुलीतून प्राप्त होणाऱ्या भांडवलातूनही कर्जवितरण होऊ लागले. थोडक्यात, पैसा फिरू लागला आणि त्यात सातत्य येऊ लागले. छोट्या छोट्या योजना घोषित केल्या. त्याला प्रतिसाद मिळू लागला. संस्थेचे संचालक मंडळ म्हणजे समाजात माहीत असलेल्या जाणत्या व्यक्तीच असल्याने प्रत्येकाच्या प्रभावक्षेत्राशी स्वरूपानंद संस्था जोडली गेली. यातून प्रारंभीची ओळख निर्माण झाली. सुदैवाने संस्थेच्या पहिल्या १० वर्षांच्या आत मी मध्यवर्ती बँकेचा संचालक झालो, वकील झालो, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळावर निवडून गेलो. या प्रतिमेचाही लाभ संस्थेला झाला. त्यात प्रत्येक वर्षी कटाक्षाने, शिस्तीने ३१ मार्च म्हणजे वर्षअखेरीच्याच दिवशी आपले सर्व कार्यालयीन हिशेबीय कामकाज संपवून आर्थिक ताळेबंद ३१ मार्च रोजीच घोषित करण्याचा शिरस्ता निर्माण केला. गेली ३० वर्षे ही परंपरा स्वरूपानंद पतसंस्था बिनचूकपणे पार पाडत आली. यातूनही समाजमानसात संस्थेबद्दलची सकारात्मक प्रतिमा प्रभावी झाली.

वितरित केलेल्या कर्जांची नियमित वसुली करून आवश्यकतेनुसार वसुलीसाठी पाठपुरावा करून संस्थेची वसुली ९९.५० टक्के ते ९९.८० टक्के यादरम्यान राखण्यात यश आले. नॉन परफॉर्मिंग असेट्स (अनुत्पादक) अर्थात एनपीए कर्ज शून्य टक्के राखण्यात यश आले. ठेववृद्धी मासात उद्दिष्ट जाहीर करून ती उद्दिष्टे पूर्ण करणारी संस्था म्हणून जनमानसात स्थान मिळवले. लेखापरीक्षण 'अ वर्ग' प्राप्त करणारी संस्था म्हणूनही संस्थेकडे कौतुकाने पाहिले गेले. संस्थेला शासनाचा सहकारभूषण, 'एनसीडीसी'चा मेरीट पुरस्कार, दीपस्तंभ पुरस्कार इत्यादी पुरस्कार सातत्याने प्राप्त होत गेले. या सगळ्यामुळे चांगली आर्थिक संस्था म्हणून संस्थेची जनमानसात ओळख होत गेली. या बाबी महत्त्वाच्या असल्या, तरी फार वरवरच्या बाबी आहेत. संस्थेची आर्थिक शिस्त पाळायची असेल, तर कोणते निकष असतात, ते संस्थेने कसे उत्तम राखले, त्यातूनही विश्वासार्ह प्रतिमा निर्माण कशी झाली, ते आपण पाहू या.

## आर्थिक पत्रके हा महत्त्वाचा चेक पॉइंट

कोणत्याही आर्थिक संस्थेचा ताळेबंद (बॅलन्सशीट), प्रॉफिट अँड लॉस अकाउंट (नफा-तोटा पत्रक), तसेच तेरीजपत्रक ही महत्त्वाची आर्थिक पत्रके म्हणजे संस्थेच्या यशस्वितेचा, सुदृढतेचा आरसा मानला जातो. स्वरूपानंद संस्थेची आर्थिक पत्रके नेहमीच स्फटिकासारखी स्वच्छ आणि घड्याळाच्या काट्याइतकीच वक्तशीर राहिली आहेत.




ताळेबंदात दिसणारे निधी, तरतुदी, प्रामुख्याने गंगाजळी, इमारत निधी इत्यादींच्या भरभक्कम रकमा संस्थेचे सौष्ठव दर्शवतात. प्रत्येक महिन्याला वाढत जाणाऱ्या ठेवी म्हणजे संस्थेची प्रोटीन्स असतात. संस्थेच्या विश्वासार्हतेचेही हे मापक म्हटले जाते.

ताळेबंदाचा तौलनिक अभ्यास करताना पाहावयाचा दुसरा मापदंड म्हणजे संस्थेची बुडीत कर्ज व्याज तरतूद. ही तरतूद प्रचंड प्रमाणात वाढत नाही ना, हे पाहणे महत्त्वाचे ठरते. तरतूद फार वाढत नाही याचा अर्थ अनुत्पादक कर्ज म्हणजे एनपीए वाढत नाही. वसुली चांगली होत आहे. बुडीत कर्ज तरतुदीप्रमाणे अन्य कोणत्या खर्चांसाठी तरतुदी केल्या आहेत, हेही ताळेबंदाची देणी बाजू (अर्थात Liability) दर्शवते. स्वरूपानंद पतसंस्थेचा विचार केला, तर बुडीत कर्जाच्या तरतुदीत फार वाढ होताना दिसत नाही, याचे कारण संस्थेची उत्तम वसुली.

स्वरूपानंद पतसंस्थेच्या देणे बाजूला निधी आणि रिझर्व्ह याची रेलचेल पाहायला मिळेल. निव्वळ नफ्यातून भरपूर निधी स्वतंत्रपणे काढून त्याची स्वतंत्र गुंतवणूक संस्थेने नियमित केलेली असते. ही संस्थेची शक्तिस्थाने आहेत. निधी या रकान्याखाली ४८ कोटी ७३ लाख संस्थेने स्वतंत्र गुंतवले आहेत. या निधीमध्ये सोने दर चढ-उतार, बँक व्याजदर चढ-उतार, नवीन तंत्रज्ञान निधी, सर्वसामान्य मुक्त निधी (फ्री रिझर्व्ह), नवीन ब्रँच स्थिरीकरण निधी असे विविध निधी आहेत. भविष्यात होणाऱ्या कोणत्याही अनियंत्रित बदलाचा फटका संस्थेला बसू नये म्हणून किंवा धक्का बसलाच तर या निधीच्या माध्यमातून त्याची तीव्रता कमी व्हावी, यासाठी प्रत्येक वर्षी निव्वळ नफा वाटणी करताना हे निधी वार्षिक सभेच्या मान्यतेने निर्माण केले जातात.

संस्थेला आपल्या व्यवसायवृद्धीसाठी जाहिरात करावी लागते. त्यासाठीसुद्धा स्वतंत्र निधी स्वरूपानंद पतसंस्था बाजूला ठेवते. त्यातूनच जाहिराती, प्रचार-प्रसार याचा खर्च होतो. त्यामुळे संस्थेच्या आर्थिक पत्रकांवरचा खर्चाचा बोजा कमी होतो.

स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या ताळेबंदात दिसणारी दणदणीत रक्कम म्हणजे मालमत्तानिर्मिती निधी आणि इमारत निधी. या दोन्ही निधींची बेरीज केली, तर २७ कोटी १५ लाख रुपये होते. संस्थेने आजपर्यंत

स्वमालकीची नऊ कार्यालये निर्माण केली. त्यासाठी गुंतवलेली रक्कम ताळेबंदात मालमत्ता बाजूला येते; पण मालमत्ता खरेदी करण्यासाठी इमारत निधी असावा लागतो. जेवढ्या किमतीची मालमत्ता तेवढा तरी निधी बँक गुंतवणुकीत असावा लागतो. नवीन जागा, ऑफिस खरेदी करायचे असेल, तर मनमानी निर्णय करता येत नाही. त्यासाठी भक्कम तरतूद असावी लागते. हे जाणून आपली मालमत्ता अधिक असावी, त्यातून गुंतवणूकदारांचे हित साधले, सुरक्षितता, स्थैर्य वाढावे, संस्थेची प्रतिमा अधिक उजळावी या दृष्टीने आधी नियोजन करून स्वरूपानंद पतसंस्थेच्या ताळेबंदात खूप आधीपासून इमारत निधी, मालमत्ता निधी गठित केला. त्यामुळेच आज संस्थेच्या स्वमालकीच्या जागा जागोजागी पाहायला मिळत आहेत. नफ्यातून १५ टक्के लाभांश देऊनही उरणारी रक्कम योग्य पद्धतीने निधी निर्माण करण्याचे सूत्र संस्थेने यशस्वीपणे राबवले, म्हणूनच आता निधीचे भरपूर वैभव आपल्या खाती जमा आहे. हा निधी सुचवणारे आम्ही असलो, तरी याला मंजुरी देणारे आपण सर्व मायबाप सभासद बंधू-भगिनीच आहात.

ताळेबंदाची मालमत्ता बाजू (Assets) पाहताना पहिल्यांदा येणारा हेड म्हणजे कॅश अँड बँक बॅलन्स. सहकार कायद्यातील तरतुदीनुसार, एकूण ठेवींच्या एक टक्का एवढी रोख शिल्लक अथवा करंट बँक शिल्लक रोज ठेवणे संस्थेवर बंधनकारक असते. आपल्या संस्थेची लिक्विडिटी (तरलता) म्हणजे रोखता पाहण्यासाठी हा हेड महत्त्वाचा ठरतो. आपल्या संस्थेने नेहमीच या रोख आणि बँक शिलकींवर योग्य नियंत्रण ठेवून कॅश रिझर्व्ह रेशो प्रमाणात राहील, याचे भान ठेवलेले दिसते.

त्यानंतर गुंतवणूक म्हणजेच संस्थेने विविध बँकांमध्ये केलेली गुंतवणूक. येथेही एकूण ठेवींच्या प्रमाणात २५ टक्के रक्कम ही स्टॅट्युटरी रिझर्व्ह म्हणून गुंतवावी लागते. तसेच, निर्माण केलेले सर्व निधी स्वतंत्र गुंतवावे लागतात. रिझर्व्ह फंडाची स्वतंत्र गुंतवणूक करावी लागते. ही गुंतवणूक महाराष्ट्र सहकारी कायदा कलम ७० मध्ये नमूद असलेल्या बँकांमध्येच करावी लागते. कोणत्याही बँकेत गुंतवणूक केली, तर ती एसएलआर गुंतवणूक ठरत नाही. त्यामुळे संस्थेची गुंतवणूक कोणत्या बँकांमध्ये आहे हे मालमत्ता बाजूला दिसणाऱ्या गुंतवणूक हेडच्या माध्यमातून सहज दृष्टोत्पत्तीस येते. आजअखेर स्वरूपानंद संस्थेची गुंतवणूक १७० कोटी ९४ लाख रुपये इतकी आहे. एसएलआर आणि निधी यांच्या बेरजेपेक्षा ही गुंतवणूक २७.४६ कोटी रुपये एवढी जास्त आहे.

## कर्जे

गुंतवणुकीनंतर येणारा हेड म्हणजे संस्थेने दिलेली विविध कर्जे. देणे बाजूला दिसणाऱ्या ठेवी आणि मालमत्ता बाजूला दिसणारी कर्जे यांचेही प्रमाण ठरलेले असते. ६० ते ७० टक्के इतके हे प्रमाण अनुज्ञेय असते. स्वरूपानंद पतसंस्थेने चांगले कर्जदार शोधून डोळसपणे कर्जपुरवठा केला आहे. ठेवींशी कर्जांचे प्रमाण आजअखेर ६३.६६ टक्के एवढे आहे. म्हणजेच एकूण ठेवींच्या ६३.६६ टक्के प्रमाणात कर्जवितरण आहे. त्याचबरोबर कर्जांची वसुलीही ९९.७१ टक्के इतकी विक्रमी राहिली आहे. तसेच, एनपीए शून्य टक्के असलेली आपली संस्था आहे.

आर्थिक पत्रकांचा विचार करताना नफा-तोटा पत्रकही महत्त्वाचे ठरते. जमा केलेल्या ठेवींवर संस्थेला किती व्याज द्यावे लागते, ते या पत्रकातून समजून येते. तसेच, वितरित केलेल्या कर्जांवर संस्थेला किती व्याज प्राप्त होते, हेही कळते. तसेच, उत्पन्न बाजूला बँक गुंतवणुकीवर किती व्याज उत्पन्न होते, अन्य मार्गांनी किती उत्पन्न होते, तसेच खर्च बाजूला संस्था करत असलेले सर्व खर्च नमूद असतात. शेवटी नफा म्हणजे खर्च बाजूच्या बेरजेपेक्षा उत्पन्न बाजू अधिक दिसते. त्या वेळी नफा होतो.

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचा आढावा घेतला, तर संस्थेचा नफा सातत्याने वाढलेला दिसतो. सन २०२४-२५मध्ये संस्थेने आपले प्रशासकीय व अन्य खर्च नियंत्रणात ठेवले. ठेव व्याज व कर्ज व्याज यात योग्य अंतर ठेवले आणि आपल्या गुंतवणुकीवर चांगले व्याज मिळवले म्हणजे व्यवसाय व्यवस्थापन कौशल्याने करत आपल्या आर्थिक साधनांचा सर्वोत्तम विनियोग करत उत्तम नफा प्राप्त करता येतो, हे स्वरूपानंद पतसंस्थेने वारंवार दाखवून दिले. अर्थकारण करायचे असेल, तर नफा होणे अनिवार्य ठरते. संस्थेची आर्थिक सुदृढता वाढवत नेली, तरच संस्थेचे अर्थकारण सुरक्षित ठेवता येते. अर्थकारणातील विविध गुणोत्तरे (Ratio) शिफारशींबरहुकूम ठेवण्याचे पथ्य स्वरूपानंद पतसंस्था सातत्याने पाळत आली. त्यामुळेच संस्थेचे उत्तम सौष्ठव संस्थेच्या आर्थिक पत्रकात प्रतीत होते. येथे विश्लेषण केलेले मुद्दे संस्थेमध्ये गुंतवणूक करताना नक्की लक्ष ठेवावेत असे आहेत. ठेवींचे अधिकचे दर नेहमीच धोकादायक असतात. म्हणूनच कोणत्याही वित्तसंस्थेत गुंतवणूक करताना अन्य माहितीबरोबरच संस्थेचे आर्थिक सौष्ठव समजावून घ्यावे.

स्वरूपानंद पतसंस्थेचे नेतृत्व मी गेली ३४ वर्षे करतोय. उत्तम आर्थिक सेवा देतानाच सभासदांच्या संपूर्ण गरजा संस्थेच्या माध्यमातूनच पूर्ण व्हाव्यात इतकी आर्थिक ताकद उभी करण्याचा माझा सातत्याने प्रयत्न राहिला आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे संस्थेचे अर्थकारण हे सुरक्षित पद्धतीने कसे पुढे जाईल हे सुनिश्चित करण्यासाठी मी डोळ्यांत तेल घालून झटत असतो. अशा प्रकारे जागरूक आणि अचूक हिशेबीय कामकाज केल्याने संस्थेचे आर्थिक रिझल्ट उत्तम राहिले. तसेच सातत्याने ते प्रसारित करून संस्थेने विश्वासार्हता प्राप्त केली. ही विश्वासार्हता जपण्यासाठी स्वच्छ, अचूक, वक्तशीर आर्थिक पत्रके तयार करण्याचा कटाक्ष ठेवणे महत्त्वाचे ठरते. संस्थेचा अध्यक्ष आणि त्याहीपेक्षा सभासदांचा प्रतिनिधी म्हणून हे कर्तव्य कर्तव्यबुद्धीने व्रतस्थ भूमिकेतून पार पाडण्याची शक्ती, बुद्धी सातत्याने जागृत राहावी, हीच स्वामीचरणी प्रार्थना.



**- ॲड. दीपक म. पटवर्धन**
**अध्यक्ष,**
**स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था**
**संपादक, स्वरूप सहकार**

# स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था, रत्नागिरी- ताळेबंद (बॅलन्सशीट) - 31 जुलै 2025

| भांडवल व देणी | | जिंदगी व येणी | |
|---|---|---|---|
| ठेवी | | हाती व बँक शिल्लक | |
| भाग भांडवल | २,०६,४१,७५०.०० | हाती शिल्लक | १,६७,००,७३२.०० |
| निधी | | जनता सहकारी बँक करंट | ७,८७,५७०.०२ |
| मालमत्ता निर्मिती निधी | ५,१५,००,०००.०० | जनता सहकारी बँक बचत | ९३,५५०.५६ |
| गंगाजळी | १५,२७,४२,६७७.५० | बँक ऑफ महाराष्ट्र करंट | ४१,८८६.६३ |
| जनरल फ्री रिझर्व्ह | २,५०,००,०००.०० | र.जि.म.स. बँक बचत | ५५,१४७.१९ |
| सिल्व्हर ज्युबिली फंड | ३,०६,९६४.०० | बँक ऑफ इंडिया बचत | २,०८,४२३.३६ |
| संस्था विकास व प्रसार निधी | १८,२७,१८९.१६ | र.जि.म.स. बँक करंट | ४,३१,४८०.१० |
| सामाजिक कल्याण निधी | ४२,६१,५४०.०६ | शामराव विठ्ठल को-ऑप. बँक करंट | ५,१९३.०० |
| प्रशिक्षण कार्यक्रम व प्रगती निधी | २१,४३,११३.०० | आयसीआयसीआय बँक करंट | २१,१९,९४०.९० |
| प्लेज्ड गोल्ड व्हॅल्यू चढउतार निधी | ३५,००,०००.०० | सारस्वत बँक करंट | १,२७,३५४.८२ |
| नवीन शाखा स्थिरता निधी | २१,६९,५२६.५० | सिंधुदुर्ग जि.म.स. बँक करंट | १०,८२६.५० |
| न्यू टेक्नोलोजी फंड | २५,८०,७२६.०० | युनिटी स्मॉल फायनान्स बँक करंट | १५,९२५.७० |
| निवडणूक फंड | २,९९,४२५.०० | | २,०५,९८,०३०.७८ |
| व्याजदर चढ उतार निधी | ५०,००,०००.०० | गुंतवणूक | |
| सभासद आणि कर्मचारी कल्याण निधी | ४५,३०,०००.०० | र.जि.म.स. बँक गुंतवणूक | १,४१,३८,७३,२११.०० |
| ग्राहक सभासद कोव्हीड १९ सहायता निधी | ४९,५५,१५५.०० | शेअर्स | १५,७२,४९०.०० |
| बिल्डींग फंड | २२,००,३५,१३५.७५ | र.जि.म.स. बँक रिझर्व्ह फंड | १५,३२,०७,८६१.०० |
| गुंतवणूक जोखीम व्यवस्थापन निधी | ६५,००,०००.०० | NKGSB गुंतवणूक | २५,००,०००.०० |
| | ४८,७३,५१,४५१.९७ | SVC बँक गुंतवणूक | २,००,००,०००.०० |
| ठेवी | | सारस्वत बँक गुंतवणूक | ४,७९,६९,३८२.०० |
| चालू ठेव | ७४,५३७.०० | ICICI बँक गुंतवणूक | २,५४,६०,५०१.०० |
| बचत ठेव | २८,४२,४३,२६६.४१ | जनता सहकारी बँक गुंतवणूक | ३८,४२,६४३.०० |
| आवर्ती ठेव | २,०९,५८,६५०.०० | DNS बँक गुंतवणूक | १,०४,८१,९७२.०० |
| धनसंचय आवर्त ठेव | ३,१७,०९,४८६.०० | बँक ऑफ महाराष्ट्र गुंतवणूक | ३,०५,११,१४५.०० |
| पिग्मी ठेव | १२,०२,९५,६७४.२० | | १,७०,९४,१९,२०५.०० |
| मासिक व्याज ठेव | १,१६,२४,३९,६९९.०० | कर्ज | |
| अल्पमुदत ठेव | २,१४,१५,८४,७७३.०० | वैयक्तिक कर्ज | १६,००,२६,७३७.०० |
| पुनर्गुंतवणूक ठेव | २,८४,१९,६०७.०० | वाहन कर्ज | ७,५६,८६,६७२.०० |
| मुदतपूर्ण ठेव | २,५०,८५९.५० | मालमत्ता कर्ज | ४२,२१,०१,६६९.०० |
| | ३,७८,९९,७६,५५२.११ | कॅश क्रेडीट | २,४४,०७,९२८.३६ |
| तरतूद | | पिग्मी/मुदत/आवर्त ठेव तारण कर्ज | १०,४०,११,२०९.०० |
| बुडीत येणे निधी | २,३०,०९,६०२.१० | सोनेतारण कर्ज | १,८७,९५,३१,०६५.०० |
| ग्रच्युईटी तरतूद | १,६७,७६,७२७.०० | सोनेतारण सी.सी. | २२,१७,६८२.०० |
| ऑडीट फी तरतूद | १२,५०,५४९.५० | | २,६६,७९,८२,९६२.३६ |
| लाभांश देणे तरतूद | २०,२९,१९५.०० | मालमत्ता | |

| भांडवल व देणी | | जिंदगी व येणी | |
|---|---|---|---|
| सानुग्रह अनुदान तरतूद | १०,६०,०६८.०० | इमारत जुनी | १०,७८९.०० |
| आकस्मिक खर्च तरतूद | ९,३५,६९२.०० | इमारत नवीन | २,८६,५७,८८१.८५ |
| म्युनिसिपल टॅक्स तरतूद | ४,५२९.०० | फर्निचर व फिक्स्चार | ९९,६०,७११.०७ |
| आऊटस्टँडिंग खर्च | १,४०,०००.०० | कॉम्प्यूटर | ६,६६,७४६.३७ |
| उत्तम जिंदगी तरतूद | ६३,३५,०००.०० | व्हेईकल | ४,९०,७०३.०० |
| स्टेटयुटरी फॉर्मलिटी कंपलेशन फंड | १,७५,६८,१६१.०० | लायब्ररी | १०,३७१.०० |
| सोसायटी मेंटेनन्स फी तरतूद | १०,००,०००.०० | डेडस्टॉक | ६६,७२,८८०.९७ |
| क्लोजिंग अलौन्स निधी | ४,८१,६६६.०० | पिग्मी मशीन | ६,१३४.९२ |
| लोस असेट तरतूद | १०,०९,४४०.०० | ऑनलाईन इन्व्हर्टर | ९,४४,२५९.०३ |
| स्टाफ इन्सेंटिव्ह फंड | ४,४८,२५८.०० | एअर कंडीशनर | ३,३१,८६६.२६ |
| रिटायर मेंट बेनिफिट तरतूद | १४,४९,२६५.०० | ऑफिस इक्विपमेंट | ७,६२,३५६.०३ |
| | ७,३४,९८,१५२.६० | बिल्डींग साठी जागा | ३,४४,८०,०००.०० |
| | | | |
| **इतर देणी** | | बिल्डिंग under construction | १,४१,८४,०४६.०४ |
| एन्टरन्स फी | ९,९६८.०० | | ९,७१,७८,७४५.५४ |
| नाममात्र सभासद फी | २८०.८० | इतर येणी | |
| ओ.बी.सी. | १४,५०,०००.०० | ॲडव्हांस | २,६४,६००.०० |
| कर्ज अनामत | ६४,२६०.६५ | टेलिफोन डिपॉझिट | १४,६९९.०० |
| अनामत | ३,९५,६४७.५० | इलेक्ट्रिसिटी डिपॉझिट | ५४,५०५.०० |
| सराफ फी | २५,९८६.०० | टी.डी.एस. येणे | १,२९,६८,८३८.०० |
| देय व्याज | २,००,९२,०४५.०० | डेफर्ड रीव्हेन्यू | २१,१४४.०० |
| आउटपुट जीएसटी | ५,५६८.०० | प्रीपेड गोल्ड आणि कॅश इन्शुरन्स | ४६,९५,१२१.०० |
| देय जीएसटी (आउटपुट) | २,१३,४३२.३८ | गुंतवणुकीवरील येणे व्याज | १,४४,६८,८७२.०० |
| आउटपुट जीएसटी (RCM) | २५,३०३.४० | सिक्युरिटी डिपॉझिट | ४,६१,०००.०० |
| RTGS NEFT सस्पेन्स खाते | ३,४५४.६० | ओ.बी.आर. | १४,५०,०००.०० |
| earnset money for building | ४,४०,०००.०० | जीएसटी येणे(इनपुट) | २६,००५.२८ |
| सिक्युरिटी डिपॉझिट (बिल्डींग) | ४,४०,०००.०० | प्रीपेड वेब सर्विस खर्च | १,६४,२०२.०२ |
| | २,३१,६५,९४६.३३ | प्रीपेड फास्ट टॅग | १,१५५.०० |
| | | | ३,४५,९०,१४१.३० |
| RDCC बँक ओव्हरड्राफ्ट | ९०,०७,६२०.८१ | एन.पी.ए. कर्जावरील येणे व्याज | |
| सारस्वत बँक ओव्हरड्राफ्ट | १५,००,०००.०० | वैयक्तिक कर्ज | ९,३८,०१५.०० |
| | १,०५,०७,६२०.८१ | मालमत्ता कर्ज | ३४,९१,६२४.०० |
| ओव्हरड्यू इंटरेस्ट रिझर्व | ४४,२९,६३९.०० | | ४४,२९,६३९.०० |
| **नफा** | | | |
| सर्व शाखांचा एकत्रित मागील नफा | ८,३५,५८,८६४.१७ | | |
| | | | |
| **चालू नफा** | ४,१०,६८,७४६.९९ | | |
| | ४,५३,४१,९८,७२३.९८ | | ४,५३,४१,९८,७२३.९८ |

# व्यवहार स्वच्छ असणे सहकारी संस्थांसाठी महत्त्वाचे : ॲड. पटवर्धन

**रत्नागिरी :** आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष (२०२५) आणि केंद्रीय सहकार मंत्रालय स्थापना सप्ताहाच्या निमित्ताने रत्नागिरी जिल्ह्यातील सहकारी संस्थांची कार्यशाळा रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रधान कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड आणि रत्नागिरी जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन लिमिटेड यांच्यातर्फे या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी या कार्यशाळेत सहभागी झाले होते. या कार्यशाळेत आदर्श संचालक मंडळ सभा या विषयावर स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे कार्याध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी मार्गदर्शन केले.

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था अत्यंत पारदर्शक पद्धतीने आणि शिस्तीने कामकाज करणारी पतसंस्था म्हणून ओळखली जाते. ॲड. पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली या पतसंस्थेने सातत्याने प्रगतीची नवनवी शिखरे गाठली आहेत. त्यामुळे आदर्श संचालक मंडळ सभा या विषयावर त्यांनी मांडलेले अनुभवाचे बोल उपस्थितांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. ते म्हणाले, 'सहकारी संस्था स्थापन करताना साहजिकच एक उद्देश समोर ठेवलेला असतो. तो




सफल होण्यासाठी संस्थेच्या संचालक मंडळाची सभा अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यामुळे संस्था उत्तम पद्धतीने मार्गस्थ होऊ शकते. संस्थेचे व्यवहार स्वच्छ, पारदर्शक आणि शिस्तीचे असणे ही संस्थेच्या प्रगतीसाठी मूलभूत बाब आहे.'

जिल्हा उपनिबंधक सोपान शिंदे यांनी या वेळी वार्षिक सर्वसाधारण सभा यावर मार्गदर्शन केले. 'देशभर सहकार चळवळ बांधण्यासाठी सहा जुलै २०२१ रोजी केंद्रीय सहकार मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. ही चळवळ काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत बांधण्यासाठी केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी पुढाकार घेतला,' असे ते म्हणाले.

# सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये पीएम सूर्यघर योजना राबवण्याबद्दल मार्गदर्शन

**रत्नागिरी :** केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयामार्फत पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी, चिपळूण आणि खेड या तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. या तालुक्यांमधील ज्या गृहनिर्माण सहकारी संस्थांकडे छतावर सौर ऊर्जानिर्मितीसाठी जागा उपलब्ध असेल, अशा गृहनिर्माण सहकारी संस्थांची प्राधान्याने निवड केली जाणार आहे. या योजनेच्या कार्यवाहीसंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी रत्नागिरी तालुक्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची सभा जिल्हा उपनिबंधक आणि सहायक निबंधक (सहकारी संस्था, रत्नागिरी) यांनी आयोजित केली होती. स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे, तसेच रत्नागिरी जिल्हा सहकारी हाउसिंग फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी या सभेत मार्गदर्शन केले. ही योजना सहकारी गृहनिर्माण संस्थांना कशी उपयुक्त ठरू शकते याबद्दल सांगतानाच पटवर्धन यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या योजनेअंतर्गत देशातील एक कोटी घरांना सौर ऊर्जा अनुदानाद्वारे




पुरवण्याचा लक्ष्यांक निश्चित करण्यात आला असून, त्यासाठी देशातील १०० शहरांची निवड करण्यात आली आहे. हर घर सूर्यघर असे उद्दिष्ट यापुढे ठेवले जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी सहायक निबंधक कार्यालय, तसेच महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक डॉ. सोपान शिंदे, सहायक निबंधक साहेबराव पाटील यांनी केले आहे.




**रत्नागिरी :** स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या कोकणनगर-रत्नागिरी शाखेतर्फे युवा उद्योजक गौरांग आगाशे यांच्या अनबॉक्स युवर डिझायर या उद्योगाकरिता ई-वाहनांसाठी अर्थसाह्य करण्यात आले. वाहनांच्या चाव्या पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्या हस्ते गौरांग आगाशे यांना प्रदान करण्यात आल्या.

या वेळी व्यवस्थापक मोहन बापट, उपव्यवस्थापक हेमंत रेडीज, कोकणनगर शाखाधिकारी गुरुप्रसाद जोशी, रिलेशनशिप मॅनेजर स्वरूप प्रभुदेसाई उपस्थित होते. खाद्यपदार्थांसह विविध वस्तूंच्या घरपोच डिलिव्हरीची सेवा पुरवण्यासाठी 'अनबॉक्स'कडून इलेक्ट्रिक दुचाकींचा वापर केला जातो. पाच वर्षांपूर्वी हा उद्योग सुरू झाला, तेव्हापासूनच या वाहनांसाठी पतसंस्थेने कर्जपुरवठा केला आहे.




**आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेतर्फे विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. ग्रुप ग्रामपंचायत गोळप येथे पतसंस्थेचे उपाध्यक्ष माधव गोगटे, रिलेशनशिप मॅनेजर स्वरूप प्रभुदेसाई यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कोळंबे, तसेच सोमेश्वर ग्रामपंचायत आणि गोशाळा येथेही वृक्षारोपण करण्यात आले.**

# सभासद आणि ग्राहक परिचय धोरण




महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळाने राज्यातील बिगर कृषी सहकारी पतसंस्थांना ‘सभासद व ग्राहक परिचय धोरण’ (KYC) या बाबतीत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या सूचना आधीपासूनच लागू असलेल्या निकषांबाबत अधिक स्पष्ट आणि तपशीलवार मार्गदर्शन करणाऱ्या आहेत. नियामक मंडळाच्या २३ जून २०२५च्या सभेमध्ये या सूचनांना मान्यता देण्यात आली आहे. या सूचनांचा ग्राहकांना उपयोगी पडेल असा भाग येथे प्रसिद्ध करत आहोत. (याचा उर्वरित भाग पुढील अंकात प्रसिद्ध केला जाईल.)

**वैयक्तिक/संयुक्त खात्याकरिता केवायसी नॉर्म्सनुसार ओळख पुराव्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

१) दोन अद्ययावत रंगीत फोटो.

२) ‘युनिक आयडेंटिफिकेशन ऑथोरिटी ऑफ इंडिया’ने (UIDAI) जारी केलेले आधार कार्ड बंधनकारक असेल. यासाठी कोणतीही सवलत असणार नाही.

३) आयकर कायद्यातील तरतुदीनुसार आधार नंबरशी संलग्न (Linked) पॅनकार्ड अनिवार्य असेल, त्या ठिकाणी ते बंधनकारक राहील; मात्र पॅनकार्ड नसल्यास आयकर खात्याच्या निकषानुसार आवश्यक त्या प्रत्येक पात्र व्यवहारासाठी आवश्यकतेनुसार फॉर्म नं. ६० किंवा ६१ मधील स्वयंघोषणापत्र (डिक्लरेशन) घेऊन त्या संदर्भात सर्वतोपरी पूर्तता करणे आवश्यक राहील.

**पत्त्याच्या पुराव्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

आधार कार्डवर खातेदाराचा अद्ययावत रहिवासी पत्ता असल्यास पत्त्याच्या पुराव्यासाठी (अॅड्रेस प्रूफ) स्वतंत्र कागदपत्राची आवश्यकता नाही; मात्र तसे नसेल, तर केवायसीकरिता अद्ययावत अॅड्रेस प्रूफसाठी खालीलपैकी कोणतेही एक अधिकृतपणे वैध कागदपत्र आवश्यक राहील.

१) पासपोर्ट/पारपत्र; २) ड्रायव्हिंग लायसन्स; ३) भारतीय निवडणूक आयोगाने जारी केलेले मतदार ओळखपत्र; ४) राज्य सरकारच्या अधिकाऱ्याने रीतसर स्वाक्षरी केलेले NREGAद्वारे जारी केलेले जॉब कार्ड; ५) केंद्र/राज्य/सरकारी विभाग, वैधानिक/नियामक अधिकारी, सार्वजनिक क्षेत्र उपक्रम, राजपत्रित अधिकारी, अनुसूचित व्यावसायिक बँका आणि सार्वजनिक वित्तीय संस्था यांनी जारी केलेले अर्जदाराच्या प्रमाणित छायाचित्रासह, रहिवासी तपशीलासह असलेले ओळखपत्र; ६) कोणत्याही सेवा प्रदात्याचे दोन महिन्यांपेक्षा जास्त जुने नसलेले युटिलिटी बिल (वीज, टेलिफोन, पोस्टपेड मोबाइल फोन, पाइप गॅस, पाणी बिल); ७) अद्ययावत मालमत्ता किंवा महानगरपालिका करपावती; ८) बँक किंवा पोस्ट ऑफिसने प्रमाणित केलेली बचत बँक पुस्तकावरील रहिवासी/पत्त्याची पुरावा माहिती; ९) नोंदणीकृत भाडेकरार; १०) सरकारी विभाग किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांद्वारे निवृत्त कर्मचाऱ्यांना जारी केलेले पेन्शन किंवा कुटुंब पेन्शन पेमेंट ऑर्डर (PPO), जर त्यांच्यामध्ये पत्ता असेल;

११) राज्य किंवा केंद्र सरकारचे विभाग, वैधानिक किंवा नियामक संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, अनुसूचित व्यावसायिक बँका, वित्तीय संस्था आणि सूचीबद्ध कंपन्या यांनी जारी केलेल्या नियोक्त्याकडून (एम्प्लॉयर) निवासस्थान वाटपाचे पत्र;

१२) केंद्र सरकारने अधिसूचित केलेले रहिवासी/पत्त्याची पुरावा माहिती असलेले इतर कोणतेही दस्तऐवज;

१३) ज्या व्यक्तींचे संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेरील राहण्याचे पुरावे असतील आणि ती व्यक्ती संस्थेच्या कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत निवासी असेल तर ज्या व्यक्तीचे आई/वडील/भाऊ/पती/पत्नी/मुलगा यांच्या नावाने संस्थेच्या कार्यक्षेत्रातील निवासाचा पुरावा व त्या व्यक्तींचे लिखित संमतीपत्र.

**एचयूएफ (हिंदू अविभक्त कुटुंब) खात्याकरिता केवायसी नॉर्म्सनुसार ओळख पुराव्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

१) एचयूएफ कर्ता यांचे दोन अद्ययावत रंगीत फोटो.

२) एचयूएफ कर्ता यांचे आधार कार्ड बंधनकारक असेल. यासाठी कोणतीही सवलत असणार नाही.

३) एचयूएफ आणि कर्ता या दोघांचे आधार नंबरशी संलग्न (Linked) पॅनकार्ड अनिवार्य असेल. यासाठी कोणतीही सवलत असणार नाही.

४) ‘एचयूएफ’मधील सर्व सह-सदस्यांची (को-पार्टनर्स) नावे व त्यांची कुटुंबप्रमुखाला सर्व व्यवहार करण्याचे संमतिपत्र.

**पत्त्याच्या पुराव्यासाठी : एचयूएफ कर्त्याचे खालीलपैकी कोणतेही एक अधिकृतपणे वैध कागदपत्र आवश्यक.**

१) पासपोर्ट (पारपत्र); २) ड्रायव्हिंग लायसन्स; ३) मतदार ओळखपत्र; ४) दोन महिन्यांपेक्षा जास्त जुने नसलेले युटिलिटी बिल (वीज, टेलिफोन, पोस्टपेड मोबाइल, पाइप गॅस, पाणी बिल)

**प्रोप्रायटरशिप/एकल मालकी व्यवसाय खात्याकरिता केवायसी नॉर्म्सनुसार ओळख पुराव्यासाठी प्रोप्रायटरची आवश्यक कागदपत्रे :**

१) दोन अद्ययावत रंगीत फोटो.

२) आधार कार्ड बंधनकारक. त्यासाठी कोणतीही सवलत असणार नाही.

३) आधार नंबरशी संलग्न (Linked) पॅनकार्ड अनिवार्य असेल. यामध्ये कोणतीही सवलत असणार नाही.


४) प्रोप्रायटरशिप मालकी हक्काच्या पुराव्यासाठी प्रोप्रायटरी फर्मच्या नावाने असलेली खालीलपैकी कोणतीही किमान दोन कागदपत्रे :

(अ) नोंदणी प्रमाणपत्र (उद्यम नोंदणी प्रमाणपत्रासह) (यूआरसी); (ब) दुकान आणि स्थापना कायदा परवाना; (क) आयकर विवरणपत्र; (ड) सीएसटी/व्हॅट/जीएसटी प्रमाणपत्र; (ई) विक्री कर/सेवा कर/व्यावसायिक कर नोंदणी प्रमाणपत्र; (फ) आयातदार निर्यातदार कोड (आयईसी); (ग) वैधानिक व्यावसायिक संस्थेकडून परवाना/प्रॅक्टिस प्रमाणपत्र; (ह) मालकी हक्काच्या फर्मचे उत्पन्न दर्शवणारा मालकाच्या नावाने प्राप्तिकर परतावा (आयकर प्राधिकरणाकडून प्रमाणित/पोच दिलेला)

**पत्त्याच्या पुराव्यासाठी : प्रोप्रायटरचे खालीलपैकी कोणतेही एक अधिकृतपणे वैध कागदपत्र आवश्यक.**

१) पासपोर्ट/पारपत्र; २) ड्रायव्हिंग लायसेन्स; ३) मतदार ओळखपत्र; ४) दोन महिन्यांपेक्षा जास्त जुने नसलेले युटिलिटी बिल (वीज, टेलिफोन, पोस्टपेड मोबाइल फोन, पाइप गॅस, पाणी बिल); ५) व्यवसाय ठिकाण/जागेशी संबंधित कागदपत्रे

# पराकोटीचा विश्वास आणि आर्थिक शिस्त हेच भांडवल



जनसंचयातून धनसंचय करणाऱ्या विश्वासार्ह संस्थेचे नावच श्री स्वामी स्वरूपानंद पतसंस्था आहे. मी निवृत्त बँक अधिकारी असल्याने या संस्थेची ३१ मार्च २०२५ रोजीची आर्थिक स्थिती अभ्यासली. ती बोलकी आणि सशक्त आहे. सर्वसाधारणपणे आर्थिक क्षेत्रातील संस्थेचे मुख्य कोण, त्यांची विश्वासार्हता किती, त्यांचे चारित्र्य स्वच्छ, शुद्ध आहे का, यावर जनमानसात अशा संस्थेचा बोलबाला होत असतो. या गोष्टीचे ही संस्था हे अप्रतिम उदाहरण आहे. कारण सुविद्य असे ॲड. दीपक पटवर्धन हे संस्थाध्यक्ष चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्वाचे आणि शिस्तीचे म्हणून ओळखले जातात, याचा अभिमान वाटतो. खरे तर आर्थिक संस्थेचे भांडवल पैसा हे नाही, तर पराकोटीचा विश्वास, आर्थिक शिस्त हेच आहे. हे स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने सिद्ध केल्याने ३४ वर्षांचा प्रवास नुसता

सुरक्षितच नाही, तर भरभराटीचा होऊ शकला. संस्थेत प्रवेश करताना आम्हा ग्राहकांच्या मनात ॲड. दीपक पटवर्धन यांची प्रतिमा असते. यातच सर्व काही आले. यामुळेच माझ्यासारखे अतिशय ज्येष्ठ नागरिकही (सुपर सीनियर सिटीझन) संपूर्ण विश्वासाने आपले धन संस्थेत गुंतवतात, जमा करतात. कारण सुरक्षितता. मागाल तेव्हा धन परत मिळण्याची खात्री.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पतसंस्थेच्या कार्यालयातील सेवकवर्ग अतिशय विनम्रपणे, हसतमुखाने सेवा देतो. हे मागील अनेक वर्षे मी अनुभवात आहे. यामुळेच मी माझ्या वयाच्या व्यक्तींशी बोलताना या संस्थेची शिफारस करतो.

'स्वरूप सहकार' मासिक ही अतिशय सुंदर आणि स्तुत्य कल्पना आहे. पतसंस्थेच्या सर्व सभासदांना आणि ग्राहकांना त्याद्वारे सर्व माहिती मिळेल, पतसंस्थेच्या कार्याचा आढावा घेता येईल आणि 'स्वरूप सहकार' हे खऱ्या अर्थाने पतसंस्थेचे मुखपत्र ठरेल. या वर्षाचा ठेववृद्धी मास राष्ट्रप्रेमाला समर्पित करण्याची योजना तर वाखाणण्यासारखीच आहे. यातून त्यांचा व्यापक दृष्टिकोन दिसून येतो. तसेच प्रत्येक ठेवीदाराच्या मागे २५० रुपयांप्रमाणे होणारी रक्कम संस्था सैन्य सहायता निधीला प्रदान करणार आहे. केवढी ही कृतज्ञता! आजच्या स्वार्थी जगात हे दुर्मीळ आहे असे माझे स्पष्ट मत आहे.

यामुळेच या पतसंस्थेची घोडदौड अशीच होत राहणार हे सांगायला ज्योतिषाची गरज नाही. पतसंस्था अध्यक्षांना आणि सेवकवर्गाला मनःपूर्वक धन्यवाद.

**- श्री. वासुदेव ऊर्फ भाऊ गद्रे, रत्नागिरी.**
(निवृत्त बँक अधिकारी, मोबाइल : ८३८१०२०८५८)

# नावारूपाला आलेली एक विश्वसनीय पतसंस्था

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था ही एक जिव्हाळ्याची संस्था आहे. या पतसंस्थेत पैसे गुंतवण्याकरिता ॲड. पटवर्धन साहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी खूप चांगल्या योजना सुरू केल्या आहेत. त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानते आणि संस्थेच्या उपक्रमांचे स्वागत करते. संस्थेचा नवा उपक्रम असलेले 'स्वरूप सहकार' हे मासिकही मला मिळाले आहे. या पतसंस्थेची मी एक ज्येष्ठ नागरिक सभासद आहे. पतसंस्थेत कधीही गेले तरी आपले काम चांगले आणि व्यवस्थित होते, याचा आनंद मोठा आहे. ही पतसंस्था सर्वांच्याच विश्वासातील असल्याने सर्व जण या पतसंस्थेकडे धाव घेतात. कर्मचारीवृंदही चांगला, मनमिळाऊ, प्रामाणिक आणि आदरशील आहे. आपुलकीने काम करण्याला महत्त्व आहे आणि ते या पतसंस्थेत पाहायला मिळते. म्हणूनच पतसंस्थेने सर्वांची मने जिंकून घेतली आहेत. पतसंस्थेचे व्याजदरसुद्धा फार चांगले असल्याने त्यांचा सर्वांना चांगलाच फायदा होतो, हीदेखील महत्त्वाची बाब आहे. पतपेढीच्या अनेक शाखा आहेत. त्यामुळे कुठेही दुसरीकडे न जाता आपली आर्थिक कामे होतात. आता तर नवीन इमारत होत असल्याने तिथे जाणे अधिकच सोयीचे होईल. पतसंस्थेची अशीच प्रगती नेहमीच होत राहावी. हीच सदिच्छा.

**- सिमंतिनी गोखले,**
निवृत्त शिक्षिका, रत्नागिरी

## मासिक सर्व घटकांना उपयुक्त

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने सुरू केलेल्या 'स्वरूप सहकार' या मासिकाचा सहकार चळवळीत कार्यरत असलेल्या सर्व घटकांना उपयोग होईल याची खात्री आहे. अभिनंदन.

**- रूपेश कुंभार**
(बँकिंग क्षेत्रातील मोठा अनुभव असलेले अधिकारी)

# तळमळीने आणि पारदर्शक काम केल्यामुळेच यश

२० जून ते २० जुलै २०२५ या ठेववृद्धी मासात तब्बल ३० कोटी पाच लाख रुपयांच्या नवीन ठेवी, जवळपास ८७ कोटींच्या ठेवींचे नूतनीकरण म्हणजेच एकूण ११७ कोटी रुपयांची भव्य उलाढाल... स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेला हे सगळे शक्य झाले आहे ते संस्थेच्या अध्यक्षपदावर गेली अनेक वर्षे अखंड समर्पणभावाने काम करणारे अध्यक्ष ॲड. दीपक मनोहर पटवर्धन साहेबांच्या नेतृत्वामुळे!



स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेवर ठेवीदारांचा असलेला विश्वास हेच सरांच्या पारदर्शक कामकाजाचे आणि तळमळीचे मोठे उदाहरण आहे. १८००पेक्षा जास्त ठेवीदारांनी, त्यातही २७० जणांनी प्रथमच संस्थेकडे आपली मेहनतीची पुंजी विश्वासाने सोपवली, हीच त्यांच्या नेतृत्वाची खरी ताकद! संस्थेच्या सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय वेळोवेळी येतो. नवीन ठेवीदारांमागे ठरावीक रक्कम पतसंस्थेने सैनिक सहायता निधीला द्यायचे ठरवले होते. त्या माध्यमातून तीन लाख ६० हजार रुपयांचा भरीव हातभार संस्थेच्या माध्यमातून या निधीला लागणार आहे, ही कौतुकास्पद गोष्ट आहे. त्याबद्दल अभिनंदन!

स्वामींचे आशीर्वाद, दादा महाराजांचे अधिष्ठान, कर्मचारीवृंद ,संचालक मंडळ आणि महत्त्वाचे म्हणजे पिग्मी एजंट या सगळ्या सहकाऱ्यांची ताकद याला ॲड. दीपक पटवर्धन यांनी जोडलेला एकच धागा म्हणजे अखंड विश्वास! ठेववृद्धी मासाच्या या ऐतिहासिक यशाबद्दल अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांचे मनःपूर्वक अभिनंदन! स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचा हा विश्वासाचा दीप असाच तेवत राहो आणि नव्या ऊर्जेने झळाळत राहो, हीच मंगल प्रार्थना!

**– उमेश शोभना किशोर कुळकर्णी,**
अध्यक्ष, रत्नेश्वर ग्रंथालय, धामणसे, रत्नागिरी




**चिपळूणमधील प्रथितयश व्यापारी राजगोपाल लड्ढा आणि आंतरराष्ट्रीय योगप्रशिक्षक असलेली त्यांची कन्या पूजा लड्ढा यांनी स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेमध्ये ठेववृद्धी मासात नवीन खातेदार म्हणून ठेव ठेवली.**

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या शाखा

### रत्नागिरी जिल्हा

**रत्नागिरी :** दुसरा मजला, रत्नागिरी मध्यवर्ती एसटी स्टँडसमोर, प्रेसिडन्सी बिझनेस हाउस, रत्नागिरी - ४१५६१२, फोन : (०२३५२) २२१२६३, ९४०३५०६३६३

**मारुती मंदिर :** जोगळेकर संकुल, नाचणे रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी फोन : (०२३५२) २२३५७७, २९५६३५, ९४२०२९३५७४

**कोकणनगर :** २५, इंदू निवास, कोकणनगर स्टॉप, मजगाव रोड, नूर क्लिनिकशेजारी, रत्नागिरी, फोन : ९४२२५६३६०९

**कुवारबाव :** गाळा नं. ४, वसुंधरा कॉम्प्लेक्स, कुवारबाव, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५६१७, ९४२१५४१९११

**पावस :** रबिया कॉम्प्लेक्स, पावस बाजारपेठ, पावस, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २३७००३, २९५८६३, ९४२०४८७०९४

**जाकादेवी :** प्रमिला कॉम्प्लेक्स, तळमजला, जाकादेवी बाजारपेठ, जाकादेवी, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २५१४१८, २९५६६३, ९४०५५७६८२९

**खंडाळा :** अनंत कॉम्प्लेक्स, पहिला मजला, धारकर मेडिकलशेजारी, खंडाळा, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २४३२६३, ९४०५०२५००९

**मालगुंड :** लक्ष्मी भवन, नॉव्हेल्टी स्टोअरसमोर, मालगुंड बाजारपेठ, मालगुंड, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २३५२०२, ९४०५०३७३०८

**पाली :** दळी शॉपिंग सेंटर, पाली बाजारपेठ, पाली, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५८५३, ८२७५६७५४४०

**लांजा :** सद्गुरू कृपा, हॉटेल प्रसन्नशेजारी, आठवडा बाजार, लांजा, ता. लांजा, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५१) २९९०६०, ७५८८३००५८३

**राजापूर :** जी-२, दत्तसाई अपार्टमेंट, साई मंदिराजवळ, चव्हाणवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २३२०६३, ९४२२९६३०९३

**नाटे :** श्री. अमोल देवरूखकर यांचे घर, सडापेठ नाटे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २९५८६३, ९४०३०४६५३८

**साखरपा :** जुगाई कृपा, जुना बस स्टँड, साखरपा बाजारपेठ, साखरपा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २९९१४७, ७५८८६६८११४

**देवरूख :** द्वारा श्री. श्रीरंग शिर्के, आपला बाजारच्या शेजारी, शिवाजी चौक, देवरूख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २६०२६३, ९४२११३८८३०

**चिपळूण :** लक्ष्मी गॅलॅक्सी, साउंड ऑफ म्युझिकसमोर, शिवाजी चौक, चिंचनाका, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५५) २५२७२८, ७५८८९३३८१०

### सिंधुदुर्ग जिल्हा

**देवगड-जामसंडे :** स्वरूप बिल्डिंग, जामसंडे बस स्टॉपजवळ, जामसंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग - ४१६६१२, फोन : (०२३६४) २६१२६३, ७५८८९५८७९८

### पुणे जिल्हा

**कोथरूड :** शॉप नं. ३, मेघरंजनी अपार्टमेंट, लेन नं. ६, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८, फोन : (०२०) २५३८५४७०, ९४०४५४८१३८

# पतसंस्था परिवारातील **ऑगस्ट महिन्यातील वाढदिवस!**

## सर्वांना वाढदिवसाच्या शुभेच्छा!



**शरदचंद्र पांडुरंग लेले**
संचालक
२०/०८/१९६७



**श्रीमती मधुरा माधव गोगटे**
संचालिका
१९/०८/१९७२



**गुरुप्रसाद प्रकाश जोशी**
शाखाधिकारी, कोकणनगर शाखा
०८/०८/१९८१



**जयेश दिलीप हर्डीकर**
शाखाधिकारी, राजापूर शाखा
१५/०८/१९९१



**प्रशांत अशोक वेतोसकर**
लिपिक, खंडाळा शाखा
२२/०८/१९९३



**सुयश श्रीकांत मराठे**
लिपिक, देवगड शाखा
०४/०८/१९९४



**अक्षय धनंजय पाटणकर**
लिपिक, रत्नागिरी मुख्य शाखा
१७/०८/१९९६



**संजीत सुधीर रानडे**
लिपिक, कोकणनगर शाखा
०५/०८/१९९७



**रूपेश बाळू मयेकर**
शिपाई, कुवारबाव शाखा
२४/०८/१९८०




**अरविंद अनंत नवाळे**
शिपाई, राजापूर शाखा
२८/०८/१९८७



**योगेश रामचंद्र मानकर**
शिपाई, पुणे शाखा
०३/०८/१९९०




**यशोधन एकनाथ आंबेरकर**
शिपाई, पावस शाखा
१८/०८/१९९१



**रोशन प्रकाश लोगडे**
शिपाई, जाकादेवी शाखा
०६/०८/२०००

# ‘स्वरूप सहकार’ मासिक ई-बुक स्वरूपातही उपलब्ध

**‘स्वरूप सहकार’चे जून आणि जुलैचे अंक आपल्यापर्यंत पोहोचले नसतील, तर स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा. हे अंक ई-बुक स्वरूपात ‘गुगल प्ले बुक्स’ आणि ‘गुगल बुक्स’वर मोफत उपलब्ध आहेत. त्यामुळे मोबाइल, टॅब, लॅपटॉप, कम्प्युटर अशा कोणत्याही गॅजेटवर ६६ देशांमध्ये ते वाचता येतील.**




**अंक वाचण्यासाठी सोबतचे क्यूआर कोड स्कॅन करावेत. तसेच पतसंस्थेच्या**
**https://swaroopanandpatsanstha.com**
**या वेबसाइटवरही ‘स्वरूप सहकार’चे अंक डिजिटल स्वरूपात वाचनासाठी उपलब्ध आहेत.**







स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या प्रधान कार्यालयाची नूतन इमारत रत्नागिरी शहरातील आठवडा बाजारानजीक उभी राहत आहे. २३ मार्च २०२५ रोजी भूमिपूजन झालेल्या या वास्तूचे बांधकाम प्रगतिपथावर आहे.



पितांबरी उद्योगसमूहाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. रवींद्र प्रभुदेसाई रत्नागिरीत आले असताना स्वरूपानंद पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन आणि व्यवस्थापक मोहन बापट यांनी त्यांची सदिच्छा भेट घेतली.



अलिबाग (रायगड) येथील सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या मालगुंड शाखेत भेट देऊन संस्थेबद्दल माहिती घेतली.



पैठण (जि. छत्रपती संभाजीनगर) येथील शालिवाहन नागरी सहकारी पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेला भेट देऊन कामकाजाविषयी जाणून घेतले.



असोंड (ता. दापोली, जि. रत्नागिरी) येथील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेला भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली.



सीए डे अर्थात राष्ट्रीय चार्टर्ड अकाउंटंट दिवसानिमित्त पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी श्री. हृषीकेश फडके आणि श्री. मंदार गाडगीळ यांना शुभेच्छा दिल्या.



वाहन खरेदी कर्ज
प्रति लाख हप्ता
२११३/-*
(मुदत ५ वर्ष)
स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था
मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य
प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.
9403 506 363 www.swaroopanandpatsanstha.com




२० मिनिटांत उपलब्ध!
जलद, सुलभ, किफायतशीर
सोनेतारण कर्ज
मर्यादा १ कोटी पर्यंत
अल्प व्याजदर *
ऐवजाचे जास्तीतजास्त व्हॅल्युएशन
तुमच्या ऐवजाची संपूर्ण सुरक्षितता
स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था
मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य
प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.
9403 506 363 www.swaroopanandpatsanstha.com